भारतीय गैर न्यायिक

भारत INDIA

रु. 500 FIVE HUNDRED RUPEES

पाँच सौ रुपये Rs. 500

सत्यमेव जयते

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ◐ 2022 ◐ BV 440062

13 FEB 2023

मुद्रांक प्रमुख लिपीक / लिपीक

## // करारनामा //

| | | | |
|---|---|---|---|
| करारनामा लिहुन घेणार | :- | उप-आयुक्त (वाहन)<br>मिरा भाईंदर महानगरपालिका<br>भाईंदर (प.), ता. जि. ठाणे | प्रथम पक्षीय |
| करारनामा लिहुन देणार | :- | मे. सिक्युअर 1 सिक्युरिटी सर्व्हिस<br>शॉप नं. 17, भुमीराज बुल्डर्स,<br>सेक्टर 20, खारघर,<br>नवी मुंबई 410210 | व्दितीय पक्षीय |

**कारणे करारनामा लिहून देण्यात येतो की ..........**

महानगरपालिकेच्या वाहनांवर कार्यादेश दिनांकापासुन तीन वर्षाकरिता ठेका पध्दतीने "वाहनचालक पुरवठा करणे" दि.17/12/2022 रोजीचा दै. नवराष्ट्र / दै. उर्दु टाईम्स / दै. बिंत्त या वृत्तपत्रात व महानगरपालिकेच्या http://mahatenders.gov.in संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली होती. "ठेका पध्दतीने वाहनचालक पुरवठा" करणेबाबत मा. प्रशासकिय ठराव क्र. 252 दि. 14/02/2023 अन्वये महानगरपालिकेने विविध विभागाकरिता ठेका पध्दतीने वाहन चालकांकरिता स्विकारलेला त्रिवार्षिक देकार व्दितीय पक्षीय यांना मान्य असुन व्दितीय पक्ष यांना बंधनकारक राहिल.

सदर देकारात व्दितीय पक्षीय महानगरपालिकेच्या सर्व प्रकारच्या वाहनांवर खालील अटीशर्तीच्या अधिन राहुन वाहन चालक पुरवठा करण्याचे मान्य केले आहे.

SECURE 1 SECURITY SERVICES MUMBAI

5/294

CHALLAN

MTR Form Number-6

| GRN | MH016005344202223E | BARCODE | | Date | 27/02/2023-19:06:43 | Form ID | |
|---|---|---|---|---|---|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| Department | Inspector General Of Registration | **Payer Details** | |
| Type of Payment | Non-Judicial Stamps<br>General Stamps SoS Mumbai only | TAX ID / TAN (If Any) | |
| | | PAN No.(If Applicable) | ACAFS7741N |
| Office Name | THN4_THANE NO 4 JOINT SUB REGISTRA | Full Name | SECURE 1 SECURITY SERVICE |
| Location | THANE | | |
| Year | 2023-2024 One Time | Flat/Block No. | BHUMIRAJ WOODS |
| **Account Head Details** | **Amount In Rs.** | Premises/Building | |
| 0030056201 General Stamps | 58500.00 | Road/Street | KHARGHAR |
| | | Area/Locality | NAVI MUMBAI |
| | | Town/City/District | |
| | | PIN | 4 1 0 2 1 0 |
| | | Remarks (If Any) | |
| | | Amount In Words | Fifty Eight Thousand Five Hundred Rupees Only |
| **Total** | 58,500.00 | | |

| | | | |
|---|---|---|---|
| **Payment Details** | STATE BANK OF INDIA | **FOR USE IN RECEIVING BANK** | |
| **Cheque-DD Details** | | Bank CIN / Ref. No. | 00040572023022774505 CKW2618730 |
| Cheque/DD No. | | Bank Date / RBI Date | 27/02/2023-19:24:08 Not Verified with RBI |
| Name of Bank | | Bank-Branch | STATE BANK OF INDIA |
| Name of Branch | | Scroll No. , Date | Not Verified with Scroll |

Department ID : Mobile No. : 9892738369

**NOTE:- This challan is valid for document to be registered in Sub Registrar office only. Not valid for unregistered document.**

**सदर चलन केवळ दुय्यम निबंधक कार्यालयात नोदणी करावयाच्या दस्तांसाठी लागु आहे. नोदणी न करावयाच्या दस्तांसाठी सदर चलन लागु नाही.**

SECURE 1 SECURITY SERVICES MUMBAI



Print Date 27-02-2023 07:09:38

ग्र२०३

## CHALLAN

MTR Form Number-6

| GRN | MH016137922202223E | BARCODE | Date 01/03/2023-15:57:47 | Form ID |
|---|---|---|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| Department | Inspector General Of Registration | Payer Details | |
| Type of Payment | Non-Judicial Stamps<br>General Stamps SoS Mumbai only | TAX ID / TAN (If Any) | |
| | | PAN No.(If Applicable) | ACAFS7741N |
| Office Name | THN4_THANE NO 4 JOINT SUB REGISTRA | Full Name | Secure 1 Security Service |
| Location | THANE | | |
| Year | 2022-2023 One Time | Flat/Block No. | BHUMIRAJ WOODS |
| Account Head Details | Amount In Rs. | Premises/Building | |
| 0030056201 General Stamps | 31400.00 | Road/Street | KHARGHAR |
| | | Area/Locality | NAVI MUMBAI |
| | | Town/City/District | |
| | | PIN | 4 1 0 2 1 0 |
| | | Remarks (If Any) | |
| Total | 31,400.00 | Amount In Words | Thirty One Thousand Four Hundred Rupees Only |
| Payment Details | STATE BANK OF INDIA | FOR USE IN RECEIVING BANK | |

| Cheque-DD Details | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Cheque/DD No. | | Bank CIN | Ref. No. | 00040572023030172292 | CKW2770764 |
| Name of Bank | | Bank Date | RBI Date | 01/03/2023-15:24:59 | Not Verified with RBI |
| Name of Branch | | Bank-Branch | | STATE BANK OF INDIA | |
| | | Scroll No. , Date | | Not Verified with Scroll | |

Department ID : Mobile No. : 9892738369

**NOTE:- This challan is valid for document to be registered in Sub Registrar office only. Not valid for unregistered document.**

सदर चलन केवळ दुय्यम निबंधक कार्यालयात नोदंणी करावयाच्या दस्तांसाठी लागु आहे. नोदंणी न करावयाच्या दस्तांसाठी सदर चलन लागु नाही.

SECURE 1 SECURITY SERVICES MUMBAI



**Print Date 01-03-2023 03:59:27**

5/209

## अटीशर्थी

1) मिरा भाईदर महानगरपालिकेच्या विविध विभागात अग्निशमन, आरोग्य विभाग, पाणी विभाग, वृक्ष विभाग तसेच मुख्य कार्यालयील सर्व प्रकारच्या वाहनांवर सकाळी 7.00 ते दु. 3.00 वाजेपर्यंत पहिल्या पाळीत, दु. 3.00 ते रात्री 11.00 वाजेपर्यंत दुसऱ्या पाळीत रात्री 11.00 ते सकाळी 7.00 वाजेपर्यंत तिसरी पाळी अशा विविध पाळीत वरील ठिकाणी ठेका वाहनचालक पुरवणे आम्हास बंधनकारक राहिल.
2) मिरा भाईदर महानगरपालिकेच्या विविध विभागातील वाहनांवर कामाच्या आवश्यकतेनुसार विविध पाळीत ठेका वाहनचालकांचा पुरवठा करणे बंधनकारक राहिल. सहाय्यक कामगार आयुक्त, ठाणे यांचे कार्यालयातील वाहनचालक पुरवठा करणेबाबत परवाना व्दितीय पक्षीय यांचे कार्यादेश दिल्यानंतर लवकरात लवकर वाहन विभागात जमा करणे बंधनकारक राहिल.
3) व्दितीय पक्षाने सक्षम ठेका वाहनचालकांचा पुरवठा करणे बंधनकारक राहिल. आवश्यकतेनुसार वाहन चालकांची संख्या कमी किंवा अधिक करण्याचा अधिकार मा. आयुक्त मिरा भाईंदर महानगरपालिका यांना राहिल.
4) प्रत्येक ठेका वाहन चालकाकडे लहान (लाईट व्हेईकल) / अवजड (हेवी) वहान चालविणाऱ्या चालकांना किमान 3 वर्षापासुनचा वैदय असलेला परवाना असणे बंधनकारक आहे.
5) अ) ठेका वाहनचालकाने दर दिवशी किमान आठ तास काम करणे बंधनकारक आहे. त्याचप्रमाणे काही वेळेस अत्यावश्यक बाबी संबंधी आवश्यकता निर्माण झालयास सदर वाहनचालकास निविदेत नमुद केल्याप्रमाणे अतिरिक्त 8 तासानंतर प्रती 3 तासाचा मोबदला संबंधित विभाग प्रमुखांनी प्रमाणित केल्यानुसार अदा करणे अनुज्ञेय राहिल.

   ब) वाहन पुर्ण स्वच्छ ठेवणे, इंधन उपलब्ध असल्याची खात्री करणे, वाहन सुस्थितीत ठेवणे इ. जबाबदारी संबंधित कंत्राट ठेका वाहन चालकाची असेल.

   क) ठेका वाहनचालकाने वाहनांच्या वस्तुची निगा राखण्याची जबाबदारी त्याच्यावर राहिल. वाहनातील वस्तुची त्यांच्या कामकाजाच्या वेळी चोरी झाल्यास त्यास व्दितीय पक्ष जबाबदार राहिल.
6) वाहन विभागाने सुचना दिल्याप्रमाणे कोणतेही वाहन (उदा. कार, जीप, अग्निशमन वाहन, रुग्णवाहिका, शववाहिनी, हायड्रोलिक शिडी, ट्रॅक्टर, डंपर इ.) चालविणे ठेका वाहनचालकास बंधनकारक राहिल.
7) ठेका वाहनचालकाकडुन निष्काळजीपणामुळे अपघात झाल्यास वाहनाचे होणारे नुकसान भरपाई संबंधित व्दितीय पक्षाकडुन वसुल करण्यात येईल. तसेच ठेका वाहनचालकामार्फत अपघातामध्ये जिवीतहानी अथवा वित्तहानी झाल्यास त्याची भरपाई तसेच फौजदारी व न्यायालयीन दाव्याबाबत कार्यवाही करण्याची सर्वस्वी जबाबदारी व्दितीय पक्षावर राहिल. याबाबत मिरा भाईंदर महानगरपालिका कडुन कोणताही मोबदला दिला जाणार नाही. याची संपुर्ण जबाबदारी निविदाकाराची राहिल.
8) व्दितीय पक्षास महानरगपालिकेने नेमून दिलेल्या वाहनांवर दररोज ठेका वाहनचालक पुरवठा करणे बंधनकारक असुन ठेका वाहनचालक पुरवठा न केल्यास सदर व्दितीय पक्षाच्या मासिक देयकातुन प्रती ठेका वाहनचालक प्रती दिन गैरहजर दिवसाचे वेतन कपात करण्यात येईल. तसेच एखादा ठेका वाहनचालक गैरहजर असल्यास त्याऐवजी नविन ठेका येईल. तसेच एखादा ठेका वाहनचालक गैरहजर असल्यास त्याऐवजी नविन ठेका वाहनचालक देणे व त्या दिवसाचे वेतन संबंधित वाहनचालकास देणे बंधनकारक राहिल.

SECURE 1 SECURITY SERVICES MUMBAI

9) ठेका वाहनचालकास संबंधित विभाग प्रमुखांच्या नियंत्रणाखाली व सुचनेप्रमाणे काम करावे लागेल.

10) किमान वेतन कायदा 1948 च्या नियमानुसार ठेका वाहनचालकांना प्रचलित किमान वेतन, विमा घरभाडे, बोनस इ. भत्ते देण्याची जबाबदारी व्दितीय पक्षास बंधनकारक राहिल. तसेच किमान वेतन कायदा 1948 नुसार मंजुर दरातील वेतन ठेका वाहनचालकांना व्दितीय पक्षानी प्रदान करावयाचे आहे. किमान वेतन कायदा नुसार वेतन दरामध्ये वाढ झाल्यास त्या दरवाढीची वेतनाची रक्कम ठेका वाहनचालक यांना व्दितीय पक्षास प्रदान करणे बंधनकारक राहिल.

11) ठेका वाहनचालक यांनी मदयपान करून वाहन चालवित असताना अपघात केल्यास अपघाती वाहनाचा संपुर्ण खर्च आपल्या देयकातुन कपात केले जाईल, याची नोंद घ्यावी.

12) कॉन्ट्रक्टर लेबर ॲक्ट 1970 अन्वये ठेका वाहनचालकांचा गटविमा, प्राव्हिडंट फंड, बोनस इ. अनुज्ञेय असणारे भत्ते ठेका वाहनचालकांना देणे बंधनकारक आहे. प्रत्येक महिन्यात ठेका वाहनचालकांचे पी. एफ अनुज्ञेय असल्यास ती रक्कम ठेका वाहनचालकांच्या वैयक्तिक खात्यावर जमा करणे हे शासकिय नियमानुसार बंधनकारक राहिल.

13) महाराष्ट्र ठेका कामगार नियम 1971 नुसार कंत्राटदाराने वाहनचालकाचे राजिस्टर ठेवणे बंधनकारक आहे.

14) प्रचलित शासकिय नियम पाळणे, तसेच शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले आदेशाची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी व्दितीय पक्षीय यांच्यावर बंधनकारक राहिल. तसेच वरील कामी आवश्यक ते सर्व परवाने व्दितीय पक्षाने संबंधित कार्यालयाकडुन प्राप्त करून घेणे बंधनकारक राहिल.

15) ठेका वाहनचालक यांनी रुग्णवाहिका किंवा इतर मनपाची वाहने पेशंट नसताना इरतत्र ठिकाणी घेऊन घेल्यास सर्वत्र जबाबदारी आपणावर राहिल.

16) करारनाम्यातील अटीशर्ती बाबत काही वाद निर्माण झाल्यास मा. न्यायालय ठाणे येथील कार्यक्षेत्र राहिल.

17) एखादया ठेका वाहनचालकाविषयी तक्रार असल्यास सदर ठेका वाहनचालकाऐवजी दुसरा योग्य तो ठेका वाहनचालक विनाविलंब पुरविणेची जबाबदारी व्दितीय पक्षाची राहिल.

18) व्दितीय पक्षाने समाधानकारक काम केल्याचे प्रमाणपत्र संबंधित विभागप्रमुख यांच्याकडुन दरमहा प्रमाणित केल्याशिवाय देयक अदा करण्यात येणार नाही.

19) व्दितीय पक्षाचे कामाबाबत अनियमितता, तक्रारी, ठेका वाहनचालकांचे काम समाधानकारक न आढळयास तसेच व्दितीय पक्षांनी ठेक्यातील अटीशर्तीचे उल्लंघन केल्यास सात दिवसांची लेखी नोटीस देऊन त्यांचे कंत्रांट रद्द करण्यात येईल व निविदाकाराने महानगरपालिकेकडे जमा केलेली सुरक्षा अनामत व अतिरिक्त सुरक्षा अनामत रक्कम / इसारा रक्कम जप्त करण्यात येईल.

20) व्दितीय पक्षाने ठेका वाहन चालकांना स्वत:च्या संस्थेच्या नावाचे ओळखपत्रा देणे बंधनकार आहे. ठेका वाहनचालकांनी ओळखपत्र स्पष्ट दिसेल अशा ठिकाणी लावणे आवश्यक आहे.

21) ठेका वाहनचालक यांनी कर्तव्याचे पालन न केल्यास या कार्यालयात तक्रारी आल्यास विभाग प्रमुख यांनी दिलेल्या आदेशान्वये सदरील वाहनचालकावर कार्यवाही करण्याची जबाबदारी आपणावर राहिल.

SECURE 1 SECURITY SERVICES
MUMBAI

22) ठेका वाहनचालकाचे नॉन क्रिमिनल प्रमाणपत्र या विभागात देणे बंधनकारक राहिल.

23) सदर ठेका 03 वर्षाकरिता राहिल. (कार्यादेश नमुद केल्याप्रमाणे कालावधी राहिल.)

24) निविदेत सादर केलेल्या दरानुसार प्रती ठेका वाहनचालक रु. २६,८४९/-महानगरपालिका व्दितीय पक्षास अदा करेल. तथापी व्दितीय पक्षीय यांनी ठेका वाहनचालक यांना उदयोग, ऊर्जा व कामगार विभाग, महाराष्ट्र यांच्याकडील वेळोवेळी निश्चित केलेल्या किमान वेतनाप्रमाणे वेतन अदा करणे बंधनकारक राहिल.

25) व्दितीय पक्ष किमान वेतनाप्रमाणे ठेका वाहनचालकास वेतद अदा केल्याबाबत बॅक स्टेंटमेंट प्रत्येक महिन्याच्या देयकासोबत सादर करणे बंधनकारक राहिल.

26) महापालिकेच्या विविध विभागात उदा. सामान्य प्रशासन, अग्निशम, वैदयकिय आरोग्य विभाग, उदयान व वृक्षप्राधिकरण विभाग, पशुसंवर्धन विभाग, आरोग्य विभाग, पाणीपुरवठा विभाग इ. विभागात महापालिकेच्या आवश्यकतेनुसार ठेका वाहनचालक पुरवठा करणे बंधनकारक असुन सदर विभागामध्ये हजेरी रजिस्टर स्वाक्षरीसह दैनंदिन भरणे ठेकेदारावर बंधनकारक राहिल. व सदर हजेरी रजिस्टर संबंधित विभागातील अधिकारी यांनी प्रमाणित करावयाचे आहे. सदर हजेरी पत्रकाच्या छायाप्रती प्रमाणित करून कार्यालयात जमा करणे बंधनकारक राहिल. तदनंतर देयक अदा करण्यात येईल.

27) प्रती महिन्याच्या देयकातुन 2% आयकर कपात वाहन विभागामार्फत कपात करण्यात येईल.

28) व्दितीय पक्षाने करारनामा लिहुन दिल्यावर महानगरपालिकेने मागणी केल्यानुसार तात्काळ ठरवुन दिलेल्या मुदतीत ठेका वाहनचालक पुरवठा करणे बंधनकारक राहिल.

29) महानगरपालिकेला आवश्यकता असल्यास कमी अधिक प्रमाणात वाहनचालक सेवा पुरवठा करणे व्दितीय पक्षास बंधनकारक राहिल. ठेका वाहनचालक कमी केल्यास व्दितीय पक्षास कोणत्याही प्रकारची तक्रार करता येणार नाही.

30) मंजुर निविदाधारकाने पुरवठा केलेल्या ठेका वाहनचालकाचे काम खंडीत केले अथवा निविदा नियम अटीचा भंग केल्यास किंवा पुरवठा केलेल्या कर्मचारी कामी संबंधित खात्याकडुन तक्रार आल्यास मंजुर निविदाधारक म्हणजेच व्दितीय पक्षीय (L1) यांची अनामत रक्कम व अतिरिक्त सुरक्षा अनामत जप्त करून सदर काम रद्द करून, सदरच्या कंपनीस काळया यादीत टाकण्यात येईल. तसेच (L2) कडुन सदर काम/ पुरवठा करून घेण्यात येईल व फरकापोटी असणारी रक्कम (L1) कडुन विहित पध्दतीने वसुल करण्यात येईल याची स्पष्ट नोंद घ्यावी.

31) महानगरपालिकेच्या आदेशांची अंमलबजावणी करावी लागेल. महानगरपालिकेच्या हिताच्या दृष्टीने सर्व नियमाचे पालन करावे लागेल. महानगरपालिकेच्या हिताविरुध्द कार्यवाही करता येणार नाही. कार्यालयीन कामकाजात गोपनियता राखावी लागेल. अन्यथा नियमानुसार कार्यवाही करण्याचा अधिकार आयुक्त सो. मिरा भाईंदर महानगरपालिका यांना राहिल.

32) मुदतीचे आत ठेकेदारास ठेका मुदतपुर्व रद्द करणेचा अधिकार महानगरपालिकेने राखुन ठेवला असुन यासाठी 15 दिवसांची पुर्वसुचना देणेत येईल.

33) यशस्वी ठेकेदारास कोणत्याही टप्प्यावर करार रद्द करावयाचा असल्यास आगाऊ 03 माहिन्याची नोटीस देणे बंधनकारक राहिल.

SECURE 1 SECURITY SERVICES MUMBAI

34) ठेका वाहनचालक बेजबाबदारीने काम करत असल्यास मनपाने कळविल्यास तात्काळ त्यावर कारवाई करणे बंधनकारक असेल. ठेकेदाराबरोबर केलेल्या कराराची मुदत कार्यादेश दिल्यापासुन 03 वर्ष कालावधी करिता राहिल. आवश्यकतेप्रमाणे वेळोवेळी मुदतवाढ देणे अथवा मुदतपुर्व करार संपुष्टात आणणेबाबत महानगरपालिकेने निर्देशाचे पालन करणे बंधनकारक राहिल.

35) सदरची निविदा मिळण्याकरिता महानगरपालिका अधिकारी यांच्यावर कोणत्याही प्रकारचा दबाव आणल्याचे कोणत्याही क्षणी आढळयास निविदाधारक / यशस्वी निविदाधारक यांची निविदा रद्द करण्यात येईल व सदर निविदाधारक यांना काळया यादीत टाकण्याची कार्यवाही करण्यात येईल.

36) निविद मंजुर ठेका वाहनचालक यांनी महानगरपालिकेबरोबर ठरवुन दिलेल्या कामाचा करारनामा नियमानुसार स्टॅम्प पेपरवर त्वरीत करून दयावा. तदनंतरच कार्यादेश देण्यात येईल. करारनाम्यातील अटी व शर्ती संबंधितावर बंधनकारक राहतील. सदर निविदा प्रपत्र करारमान्याचा भाग असेल.

37) प्रत्यक्ष कामकाज करताना बदली विभागाचे कामकाज ठेका वाहनचालकांस दिल्यास सदर वाहनचालकांस विनातक्रार करावे लागेल.

38) ठेका वाहनचालकाने महानगरपालिकेच्या कामकाजासाठी नेमलेल्या ठेका वाहनचालकांना किमान वेतन कायदयातील तरतुदीपेक्षा कमी वेतन अदा केल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित कंत्राटदारावर किमान वेतन कायदयातील तरतुदीप्रमाणे कारवाई करण्यात येईल व त्याचे ठेका वाहनचालक/ ठेका तात्काळ रद्द करून त्याचे नाव काळया यादीत टाकण्याची कार्यवाही करण्यात येईल.

39) मंजुर व्दितीय पक्षाकडुन नियमाप्रमाणे आयकर व अन्य कर देयकातुन कापुन घेण्यात येतील.

40) दरमहा कामाचे देयक, विभाग निहाय काम केल्याबाबतचे विभाग प्रमुखाचे / अधिकाऱ्यांचे शिफारशीसह सादर करावे लागेल.

41) व्दितीय पक्षाने पुरविलेल्या कर्मचाऱ्यांच रजा, वेतन आणि तद्अनुषंगिक सेवा विषयक बाबींची पुर्तता कर्मचाऱ्यांसाठी तयार करण्यात आलेल्या प्रचलित शासकिय नियम, तरतुदी आणि आदेशानुसार करणेची जबाबदारी ठेकेदाराची राहिल. यासंबंधिचे सर्व दस्ताऐवज ठेवण्याची जबाबदारी संबंधित व्दितीय पक्षाची राहिल.

42) नियुक्त करण्यात आलेल्या ठेका वाहनचालक कामगारांचे वेतन दर महिन्याच्या 15 तारखेपर्यंत देणे ठेका वाहनचालकावर बंधनकारक राहिल.

43) ठेका वाहनचालक यांनी अति वेगाने वाहन चालवुन अपघात केल्यास त्याचा खर्च आपणाकडुन वसुल केला जाईल.

44) कंत्राटदार व ठेका वाहनचालक यांचेमध्ये कोणताही तंटा / वाद निर्माण झाल्यास महापालिका हस्तक्षेप करणार नाही. तसेच तंटावाद यामुळे महानगरपालिकेचे होणारे नुकसान ठेकेदाराच्या बीलातुन वसुल करण्यात येईल.

45) निष्काळजीपणा, अज्ञात, सहेतुक कार्यवाही अथवा ठेकेदाराशी संबंधित कारणाने महानगरपालिका मालमत्तेची हानी झाल्यास किंवा अन्य दोष राहिल्यास, कोणताही बोजा निर्माण झाल्यास उपलब्ध अभिलेखानुसार होणारी नुकसान भरपाई संबंधित ठेकेदार यांच्या देयकातुन / अनामत / सुरक्षा अनामत रक्कमांमधुन वा अन्य कायदेशीर मार्गाने

SECURE 1 SECURITY SERVICES MUMBAI

वसुल केली जाईल. प्रसंगानुरुप अन्य कायदेशीर कार्यवाहीस संबंधित ठेकेदार व त्यांचेकडील सेवा पुरवणाऱ्या व्यक्ति पात्र ठरतील.

46) या कामी स्थानिक निधी व अंतर्गत लेखापरिक्षणात काही आक्षेप आल्यास त्याची योग्य पुर्तता करण्याची जबाबदारी व्दितीय पक्षावर राहिल.

47) ठेका वाहनचालक यांनी आपले वाहन सोडुन जुगार (सट्टा) खेळताना आढळल्यास सर्वस्वी जबाबदारी आपणांवर राहिल.

48) प्रत्येक ठेका वाहनचालक यांना साधारण आठ तासाची एक पाळी राहिल. कामाचे तास हे संबंधित ठेका वाहनचालकांना आवश्यकतेप्रमाणे सुचनेनुसार तिन्ही पाळयामध्ये काम करावे लागेल.

49) व्दितीय पक्षाने पुरविलेल्या ठेका वाहनचालक वाहन विभागात काम करित असताना कायमस्वरुपी नोकरीसाठी कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क अथवा मागणी विचारार्थ घेण्यात येणार नाही. याबाबत सदर कर्मचाऱ्यांनी महानगरपालिकेस हमीपत्र देणे आवश्यक आहे.

50) या कत्राटासंबंधी कोणताही वाद उत्पन्न झाल्यास मा. आयुक्त यांचा निर्णय अंतिम राहिल.

51) Subcontract :- पुरवठा केलेल्या ठेका वाहनचालकांचे काम सबकॉन्ट्रक्टर / कंपनी / ठेकेदार / इतर व्यक्ति यांना देता येणार नाही.

52) महाराष्ट्र शासन निर्णय क्र. कोरोना-2020/प्र.क्र.110/आरोग्य-5 दि. 29 मे 2020 रोजीच्या शासन निर्णयानुसार वाहनचालक यांनी तंबाखु, सुपारी पान, गुटखा तसेच इतर तंम्बाखूजन्य पदार्थ, मदयपानाचे सेवन करण्यास प्रतिबंध करण्यात आलेले असल्याने वाहनचालकाबद्दल तक्रार आल्यास सदरील वाहनचालकावर पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. तसेच सदर वाहनचालक कामावरुन कमी करण्यात येईल.

वरीलप्रमाणे करारनामा लिहुन देणार यांची निविदा महानगरपालिकेने मंजुर केलेली असुन सदर काम हे 36 महिने मुदती करीता करावयाचे आहे.

सदर कामाच्या निविदा सुचना व निविदा फॉर्म मधील सर्व अटीशर्ती कलमे आम्हास मान्य असुन त्यानुसार सदर काम पुर्ण करून देण्याची जबाबदारी आमची राहिल. सदर करारनामा आज दि.२७ / ०३ /2023 रोजी चांगल्या मनस्थितीत लिहुन दिला आहे.

| करारनामा लिहुन घेणार<br>(प्रथम पक्षीय) | करारनामा लिहुन देणार<br>(व्दितीय पक्षीय) |
|---|---|
| उप-आयुक्त (वाहन विभाग)<br>मिरा भाईंदर महानगरपालिका<br>भाईंदर (प.), ता. जि. ठाणे | मे. सिक्युअर 1 सिक्युरिटी सर्व्हिस<br>शॉप नं. 17, भुमीराज वुल्डर्स,<br>सेक्टर 20, खारघर,<br>नवी मुंबई 410210 |

SECURE 1 SECURITY SERVICES MUMBAI

२३ / करारनामा रजिस्टर अनु. क्र. ७५३९ दि.२७/३/23 अन्वये नोंद करणेत आली.

शहर अभियंता
मिरा-भाईंदर महानगरपालिका

महापालिका सचिव
मिरा-भाईंदर महानगरपालिका

अतिरिक्त आयुक्त
मिरा-भाईंदर महानगरपालिका